# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपिल**
**क्र.रामाआ नाशिक/द्वितीय अपिल क्र.२६७/२०२१/धुळे**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.शरद रामदास महाले, रा.रो हाऊस नं.१०, चिंतामणी पार्क, चक्रधर नगर, पंचवटी, नाशिक-३. | सचिव, दुसाणे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि. दुसाणे ता.साक्री. जि.धुळे. | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था साक्री यांचे कार्यालय, आदर्श नगर, जैन कॉम्प्लेक्सच्या पाठीमागे, धुळे रोड, साक्री ता.साक्री, जि.धुळे. |

**द्वितीय अपिल सुनावणी दि.०६/११/२०२३**

| मूळ अर्ज दिनांक | मूळ अर्ज ज.मा.अ. यांना प्राप्त दिनांक | ज.मा.अ. यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०७/११/२०२० | -- | -- | २१/१२/२०२० | -- | -- |

अपिलार्थी यांनी दि.२५/०१/२०२१ रोजीच्या अर्जान्वये "अद्यापपर्यंत कुठलीही माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद करुन आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे.

२. सदर द्वितीय अपिलाच्या सुनावणीस सर्व पक्षकार उपस्थित आहेत.

३. अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.०७/११/२०२० रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे "सन २००५ ते मार्च २०२० या कालावधीतील दुसाणे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि. दुसाणे या संस्थेचे झालेले आर्थिक व्यवहार" इ. माहिती मागितली आहे.

४. याप्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध असलेली कागदपत्रे आणि युक्तिवादावरुन असे दिसून येते की, दुसाणे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि. दुसाणे ता.साक्री, जि.धुळे या संस्थेस कुठल्याही प्रकारचे शासकीय अनुदान अथवा निधी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मिळत नाही. त्यामुळे सदर सहकारी संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही.

सबब, याप्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.२६७/२०२१/धुळे निकाली काढण्यात येत आहे.

**( भूपेन्द्र गुरव )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

जावक क्र. अ/-२२२ , दिनांक :- 15 MAR 2024